पुण्य नगरी, औरंगाबाद, सोमवार, २७ फेब्रुवारी २०१७.

# पतसंस्थाचालकांनी मानसिकता बदलावी -हरिभाऊ बागडे

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

पत नसलेल्या माणसाला पत निर्माण करून देण्याचे काम सहकारी पतसंस्था करीत आहेत. पतसंस्थाचालक जोपर्यंत आपली मानसिकता बदलणार नाहीत, तोपर्यंत त्यांची संस्था पुढे जाणार नाही असे प्रतिपादन राज्य विधानसभे अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी केले.

सिडको येथील जगद्गुरू संत तुकाराम नाट्यगृहात सहकार भारतीच्या देवगिरी प्रांतातर्फे आयोजित सहकार संगम कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते मार्गदर्शन करीत होते. सहकार क्षेत्र भीतीपोटी नव्हे तर ताठ मानेने चालवायला पाहिजे सध्या अनेक पतसंस्था अडचणीत आहे, परंतु संस्थाचालकांनी हा काळ म्हणजे संस्था बळकटीचा काळ समजून कार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

व्यासपीठावर सहकार भारतीचे अध्यक्ष संजय बिर्ला, प्रदेश उपध्यक्ष ओमप्रकाश कोयटे, देवगिरी नागरी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष व स्वगताध्यक्ष किशोर शितोळे, सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, सहकार संगमचे संयोजक डॉ. शांतीलाल शिंगी, राष्ट्रीय महिला प्रमुख संध्याताई कुलकर्णी, अध्यक्ष बबनराव जगाडे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. तसेच सहकार भारतीतर्फे उपस्थित मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी सायबर सुरक्षा व संगणकीकरण अजय निकुंभ यांनी मार्गदर्शन केले.

ओमप्रकाश कोयटे यांनी पतसंस्था चळवळीसमोरील आव्हाने उपस्थितांसमोर मांडली.



सहकार संगम कार्यक्रमाचे उद्घाटन करताना विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे. सोबत संजय बिर्ला, ओमप्रकाश कोयटे, किशोर शितोळे, भालचंद्र कुलकर्णी आदी.